**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया, प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

10/10/2020
(बा[illegible]साहेब [illegible]गे)
सहायक जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र. २२७९९३९५

---

प्रसिध्दी पत्रक : ०५
दिनांक : १०.१०.२०२०

## २०२१-२२ या वर्षाकरिताचे बेस्ट उपक्रमाचे अर्थसंकल्प अंदाज सादर

मुंबई १० - बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक, डॉ.,सुरेंद्रकुमार बागडे, भा.प्र.से. यांनी दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२० रोजी भरलेल्या बेस्ट समिती सभेमध्ये, २०२१-२२ या वर्षाकरिताचे अर्थसंकल्प अंदाज बेस्ट समितीला सादर केले.

बेस्ट समितीला सादर करण्यात आलेल्या २०२१-२२ या वर्षाकरिताच्या अर्थसंकल्प अंदाजामध्ये बेस्ट उपक्रमाची रु.१८८७.८३ कोटी एवढी एंकदरीत अंदाजित तूट दर्शविण्यात आली आहे. २०२१-२२ (अर्थसंकल्प) या वर्षाच्या भांडवली खर्चाकरिता रु.४४६.०७ कोटी एवढया रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

२०२१-२२ या अर्थसंकल्पीय वर्षाकरिता महसुली अंदाजाचे संक्षिप्त तपशिल पुढे दर्शविण्यात आले आहेत.

(रु. कोटीत)

| | विद्युत पुरवठा | परिवहन | संपूर्ण उपक्रम |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ३५३२.३० | १४०७.०० | ४९३९.३० |
| खर्च | ३७९५.८९ | ३०३१.२४ | ६८२७.१३ |
| + शिल्लक / - तुट | -२६३.५९ | -१६२४.२४ | -१८८७.८३ |

....२/-

सन २०२१-२२(अर्थसंकल्प) अंदाजामधील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

## ए – विद्युत पुरवठा

१. **३३ केव्ही नवीन विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) :**

२०२१-२२ या वर्षामध्ये, एम.जी.एम.रुग्णालय विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) आणि दोस्ती एकर्स विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) येथे, १६ एमव्हीए ऊर्जा रोहित्रांसहित नवीन ३३/११ केव्ही विद्युत संग्राही उपकेंद्राचे (RSS) प्रत्येकी १ नग कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त, किंग्जवे विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) येथे १६ एमव्हीए ऊर्जा रोहित्राचा अतिरिक्त १ नग कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यामुळे संचमांडणी केलेल्या उपकेंद्रांच्या क्षमतेमध्ये ४८ एमव्हीएने वाढ होईल.

२. **33 केव्ही क्षमतेमध्ये रुपांतर -**

२०२१-२२ या वर्षामध्ये, ३३ केव्ही क्षमतेमध्ये रुपांतर करण्याच्या कार्यक्रमाअंतर्गत, अनुक्रमे माझगांव डॉक, महालक्ष्मी विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) आणि भायखळा विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) येथे प्रत्येकी १ नग याप्रमाणे १० एमव्हीए, २२/११ केव्ही ऊर्जा रोहित्रांचे ३ नग, १६ एमव्हीए, ३३/११ केव्ही ऊर्जा रोहित्रांनी बदलण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यामुळे संचमांडणी केलेल्या उपकेंद्रांच्या क्षमतेमध्ये १८ एमव्हीए एवढी वाढ होणार असून सिस्टिमच्या विश्वासार्हतेमध्ये सुधारणा होऊन वितरण हानी मध्ये कपात होण्याकरिता सहाय्य होईल.

३. **विद्यमान विद्युत संग्राही उपकेंद्रांमध्ये (RSSs) जुने ३३/२२ केव्ही सर्किट ब्रेकर्स, व्हॅक्यूम सर्किट ब्रेकर्स,(VCBs)/एसएफ ६ सर्कीट ब्रेकर्सने बदली करणे :**

२०२१-२२ या वर्षामध्ये, सायन फोर्ट, माझगांव डॉक (प्रत्येकी १ नग), शिवडी विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS)(२ नग) आणि माहिम कॉजवे विद्युत संग्राही उपकेंद्र (RSS) (३ नग) येथील ४ ठिकाणच्या विद्यमान कालबाह्य सर्किट ब्रेकर्सचे ७ नग, सुधारित ३३ केव्ही व्हॅक्युम सर्किट ब्रेकर्सने बदली करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

या व्यतिरिक्त, एलफिन्स्टन मिल विद्युत संग्राही उपकेंद्र येथील ३३ केव्ही फिडर्सची बॅक टू बॅक जोडणी काढून टाकून विद्युत पुरवठ्याची विश्वासार्हता सुधारण्याकरिता एलफिन्स्टन मिल विद्युत संग्राही उपकेंद्र येथील ३३ केव्ही एआयएस (AIS) बस सेक्शन (प्रत्येक बस सेक्शन मध्ये ३ सर्किट ब्रेकर्स आहेत) २ नगांची संचमांडणी करुन विद्यमान सर्किट ब्रेकर्स बदली करण्याचे देखील प्रस्तावित करण्यात येत आहे.

२०२१-२२ या वर्षामध्ये, एमजीएम रूग्णालय आणि दोस्ती एकर्स येथे नवीन विद्युत संग्राही उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी अतिरिक्त ३३ केव्ही स्वीचगीअर्सचे संचमांडणी (प्रत्येकी १ नग) करण्याचे देखील प्रस्तावित करण्यात येत आहे.

....३/-

४. **<u>इलेक्ट्रॉनिक वीजमापकांची पुनःस्थापना</u>** :-

गेल्या २ वर्षामध्ये मोठया प्रमाणामध्ये पारंपारीक पध्दतीची सुमारे २ लाख वीजमापके बदलून इलेक्ट्रॉनिक वीजमापकांची पुनःस्थापना करण्यात आली. येथुन पुढे देखील ही जुनी वीजमापके बदलण्याचा कार्यक्रम चालू ठेवण्यासाठी पुढील २ वर्षात सुमारे २.५ लाख इलेक्ट्रॉनिक वीजमापके खरेदी करण्यात येतील. तसेच मार्च, २०२२ पर्यंत सुमारे १ लाख पारंपारीक पध्दतीची वीजमापके बदलून नवीन इलेक्ट्रॉनिक पध्दतीची वीजमापके बसवण्यात येतील.

५. <u>वितरण जालव्यूहाचे मजबुतीकरण</u> :

विद्युत वितरण जालव्यूह मजबूत करण्याकरिता, २५ कि.मी. लांबीचा ११ केव्ही उच्च व्होल्टता (HV) तारखंड, ९६ कि.मी. लांबीचा १.१ केव्ही निम्न व्होल्टता (LV) तारखंड (सर्विस तारखंडाच्या समावेशासह) टाकण्याचे आणि वित्तीय वर्ष २०२१-२२ या वर्षादरम्यान नवीन विद्युत वितरण उपकेंद्राचे प्रत्येकी ४० नग कार्यान्वित करण्याचे देखील प्रस्तावित करण्यात येत आहे.

६. **<u>उच्च मूल्य विजग्राहक आणि पध्दती वीज मापनाकरिता स्वयंचलित वीजमापक पायासुविधा</u>**:

वित्तीय वर्ष २०२१-२२ यामध्ये, स्वयंचलित वीजमापक पायाभूत प्रकल्प या अंतर्गत अर्थ फॉल्ट पॅसेज इंडिकेटर (EFPI) यासह एकत्रित केलेली वीज मापन पध्दती आणि उच्च मूल्य वीजग्राहकांकरिता २०,००० स्मार्ट वीजमापकांची संचमांडणी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. विद्यमान / प्रस्तावित इआरपी (ERP), जीआयएस (GIS), सीआरएम(CRM), मोबाईल ॲप्लीकेशन, एसएमएस(SMS) गेटवे इत्यादीसह असलेल्या एएमआय (AMI) पध्दतीचे एकत्रिकरण ह्या बाबींचा सदर प्रकल्पांमध्ये समावेश होतो. एएमआय (AMI) प्रकल्पामध्ये वितरण उपकेंद्राच्या स्वीचगीअर्सची स्थिती, ऊर्जा खरेदीचे वेळापत्रक तयार करणे, फेरफार तडजोड व्यवस्थापन, मालमत्ता व्यवस्थापन, वीजग्राहकांकरिता माहिती (उच्च मूल्य वीजग्राहकांकरिता) इत्यादींचा समावेश होतो.

## <u>बी – बस विभाग</u>

1. **<u>बसताफ्यात वाढ</u>** :-

माहे ऑक्टोबर २०२० मध्ये बेस्ट उपक्रमाकडे ३८७५ बसगाड्यांचा ताफा आहे. ज्यामध्ये १०९९ भाडेतत्वावरील बसगाड्यांचा समावेश आहे. या व्यतिरीक्त ३०० विद्युत बसगाड्यांचा खरेदी आदेश देण्यात आला आहे. तसेच ६०० एकमजली सीएनजी बसगाड्यांकरीता निविदा प्रक्रिया कार्यरत आहे. पहिल्या टप्प्यात उपक्रमाचा एकूण बसताफा ३१ मार्च २०२२ पर्यंत ६३३७ इतका करण्याचे प्रस्तावित आहे.

२. **<u>बसस्थानके / बसचौक्या / बसथांब्यावर प्रवासी माहिती प्रणाली उपलब्ध करुन देणे :</u>**

विविध बसस्थानके, बसचौक्या व बसथांबे मिळून एकूण ८०० ठिकाणी प्रवासी माहिती प्रणाली अंतर्गत प्रवाशांना उपक्रमाच्या बससेवेची माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामध्ये बसगाडीची बसथांब्यावर येणारी अपेक्षित वेळ प्रवाशाला समजू शकेल.

३. **<u>स्वयंचलित प्रवासभाडे आकारणी यंत्रणा</u>** :-

भारत सरकारने देशातील सार्वजनिक वाहतूक क्षेत्राकरिता 'नॅशनल कॉमन मोबीलिटी कार्ड' (National Common mobility Card – NCMC) **एक राष्ट्र - एक कार्ड** ही योजना राबविण्याचे ठरविलेले आहे. सदर कार्ड हे सर्व प्रकारच्या सार्वजनिक प्रवासी वाहतूक क्षेत्राला लागू असेल. उदा. रेल्वे, बसेस, मोनोरेल, मेट्रोरेल इ. बेस्ट उपक्रम देखिल या योजनेत सहभागी असल्याकारणाने, प्रायोगिक तत्वावर ही योजना कुलाबा व वडाळा आगारात ऑक्टोबर, २०२० पासुन राबविण्यात आली आहे.

## <u>सी – सर्वसाधारण</u>

**अद्ययावत संगणक प्रणालीची अंमलबजावणी**

आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये माहिती तंत्रज्ञान विभागाकडून खालील कार्ये पार पाडली जातील:

१. उपक्रमाच्या विविध विभागांकरिता वेब बेस्ड ॲप्लिकेशन विकसित करुन त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

२. उपक्रमाच्या विद्युत देयक आकारणी पध्दतीमध्ये आणि ग्राहक सेवा विभागाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रपध्दतीसहीत ईआरपी प्रकल्पाची अंमलबजावणी.

३. नेट मीटरिंग बिलिंग प्रणालीचा विकास करण्यात येईल.

४. रूफटॉप सौर प्रकल्पांसाठी बेस्ट उपक्रमाचे नवीन ऑनलाइन पोर्टल विकसित करुन त्यांची अंमलबजावणी आणि एमएनआरई (Ministry of New And Renewable Energy) सिंगल पोर्टलशीएकीकरण करण्यात येईल.

वरील उल्लेखनीय बाबीसहीत सन २०२१-२२ चे अर्थसंकल्प अंदाज बेस्ट समितीला सादर करण्यात आले.

---